# पी.डब्लू.डी.व्ही.ए.नं. ८४/२०२३ मधील अंतरिम अर्जावरिल आदेश

**CNR No. MHST07-003684-2023**

**दिव्या अमोल पवार वि. अमोल जोतीराव पवार**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात असे की :–**

२. अर्जदाराने असे कथन केले की, तिचा विवाह सामनेवाला क्र. १ यांचेसोबत दि. १८.११.२०१३ रोजी झाला आहे. सदर लग्न संबंधातून मुलगी भाग्यश्री व मुलगा रुद्र अशी दोन अपत्ये झालेली आहेत. अर्जदार ही सामनेवाला याच्याकडे नांदण्यासाठी गेल्यानंतर सामनेवाला क्र. १ याने काही दिवसच अर्जदारास चांगले नांदविले. त्यानंतर सामनेवाले हे अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत, वारंवार मारहाण व अश्लील भाषेत शिवीगाळ करत असत. तसेच तिला पुढील शिक्षण घेण्यास, घरातून बाहेर पडण्यास, माहेरच्या लोकांना भेटण्यास बंदी केली होती. सामनेवाला हा अर्जदार हिच्या औषधोपचाराचा करत नसत, तिला शिळे अन्न खायला देत असता, घरातून बाहेर काढत होते तसेच मुलगी झाल्यानंतर देखील सामनेवाला याने तिला घरातून बाहेर काढले होते. सामनेवाला हे अर्जदाराकडे रु. ५०,०००/– घेवून येण्याची मागणी देखील करत होते. अशाप्रकारे सामनेवाला यांनी अर्जदार हिचा शारिरिक व मानसिक छळ केला आहे.

३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला याने अर्जदार व अर्जदार क्र. २ यांच्या उदरनिर्वाहाची सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने अशी विनंती केली आहे की, तिला व मुलगा रुद्र याचे चरितार्थ चालविणेसाठी दरमहा अंतरिम पोटगी र.रु. १५,०००/– व घरभाडे खर्चाची र.रु. ५,०००/– एवढी रक्कम मंजूर होवून मिळावी अशी विनंती केली आहे.

४. सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या अंतरिम पोटगी अर्जावर म्हणणे नि. ८ वर दाखल करुन अर्जातील सर्व कथने खोटी व लबाडीची असून, त्यांना ती मान्य व कबूल नसल्याचे सांगितले आहे. सामनेवाला यांचे कथन असे आहे की, अर्जदार ही तिला सासरी कोणताही त्रास नसताना सामनेवाला याच्याकडे वारंवार वेगळे राहण्याचा हट्ट करत असे, त्याप्रमाणे ते दि. ०८.०६.२०२३ रोजी विभक्त राहू लागले. परंतु, अर्जदार हिची आई व बहिणी तिला फोनवर सामनेवाला सोबत नांदू नकोस असे सांगत असत. त्यामुळे अर्जदार ही दि. १३.०६.२०२३ रोजी सामनेवाला घरात नसताना तिचे सर्व साहित्य घेवून माहेरी निघून गेली आहे. त्यानंतर सामनेवाला यांनी अर्जदारास नांदण्याबाबत वारंवार विचारणा केली असता अर्जदार हिने घटस्फोटाची मागणी केली. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे व सामनेवाला हे मुलांसोबत केर्ली येथे राहत आहेत. अर्जदार ही नर्सिंगचे काम करत असून त्यातून तिला दरमहा र.रु. १५,०००/- इतका पगार मिळत आहे. तेव्हापासून अर्जदाराने मुलांची कोणतीही विचारपूस केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिचा प्रस्तुतचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

५. उभय पक्षकारांचे कथने विचारात घेता अर्जाच्या निर्णयासाठी खालील वादप्रश्न उपस्थित झाले. त्यासंबंधीचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथम दर्शनी सिद्ध करते काय की, सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे ? | होय |
| २ | अर्जदार हे सिध्द् करतात काय की, सा.वाला यास उत्पन्नाचे साधन आहे ? | होय |
| ३ | अर्जदार हे सिद्ध करतात काय की, तिला उत्पन्नाचे | होय |

| | | |
|---|---|---|
| | कोणतेही साधन नाही ? | |
| ४ | अर्जदार ही सा.वालाकडून अर्जात नमुद केल्याप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय? जर होय, तर कोणते आदेश ? | होय, अंतीम आदेशाप्रमाणे |
| ५ | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र. १ करिता :-**

६. अर्जदार व सामनेवाला यांचे लग्न झाल्याचे व सदर विवाहातून त्यांना मुलगी भाग्यश्री व मुलगा रुद्र ही अपत्य झाल्याची बाब उभयपक्षकारांना मान्य व कबूल आहे. तसेच अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे देखील उभयपक्षकारांना मान्य व कबूल आहे. अर्जदार हिने तिचे शपथपत्रात असे नमुद केले आहे की, विवाहानंतर अर्जदार हिला सामनेवाला व त्याच्या घरच्यांनी तिला शारिरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. सामनेवाला क्र. १ हा किरकोळ कारणांवरुन अर्जदार हिला घालून पाडून बोलून अपमानित करत होते. तसेच सामनेवाला हे अर्जदाराला मारहाण करुन तिचा शारिरिक छळ करत असत. त्याबाबत तिने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली असल्याचे देखील दिसून येत आहे. त्यामुळे अर्जदार ही सध्या तिचे माहेरी राहत आहे.

७. याउलट, सामनेवाला यांनी त्यांच्या खुलाशामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार हिने जाणीवपूर्वक स्वतःस सामनेवालापासून वेगळे केलेले आहे. तसेच त्यांनी अर्जदाराचा कधीही शारिरिक व मानसिक छळ केलेला नाही.

८. अर्जदार व सामनेवाला यांचे कथनावरुन, हे स्पष्ट होते की, अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार माहेरी राहण्याचे कारण उभय पक्षकारांनी वेगवेगळे नमुद केले आहे. असे असले तरी, अर्जदार ही कोणत्याही ठोस कारणाशिवाय तिचे सासरचा त्याग करुन माहेरी जाईल हे पटत नाही. अर्जदार हिने शपथेवर तिचा सामनेवाला यांनी शारिरिक व मानसिक छळ केला आहे असे नमुद केले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार हिचा सामनेवाला यांनी कौटुंबिक हिंसाचार केला आहे हे सिद्ध होते. तसेच अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने तिच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही तरतूद केलेली दिसून येत नाही. सदरची बाब ही आर्थिक हिंसाचार या प्रकारात मोडते. सबब, प्रथमदर्शनी हे सिद्ध होते की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ ते ५ करिता :-</u>**

९. अर्जदार हिला नर्सिंगची नोकरी असून तिला त्यातून र.रु. १५ हजार इतके उत्पन्न मिळत असल्याचे सामनेवाला यांनी त्यांच्या खुलाश्यामध्ये कथन केले आहे. परंतु, सदरची बाब सिद्ध करण्यासाठी सामनेवाला यांनी कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, अर्जदार ही तिचे उदरनिर्वाह करु शकते ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होत नाही.

१०. सामनेवाला याने त्याचे मालमत्ता व दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रात त्यास खाजगी नोकरीतून दरमहा रु. १३,०००/- इतके उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केले आहे. सामनेवाला याचे वय व शारिरिक परिस्थिती याचा विचार करता त्याची शारिरिक कष्टाची कामे करण्याची क्षमता असल्याचे दिसून येते. त्यामुळे तो त्याच्या नोकरीतून व शारिरिक कष्टाची कामे करुन दरमहा रक्कम रुपये २५ ते ३० हजार निश्चीतपणे कमवू शकतो. अशाप्रकारे सामनेवाला यास उत्पन्नाचे पुरेशे साधन आहे हे प्रथमदर्शनी सिद्ध

होते. परंतु, सामनेवाला याची मुले देखील त्यासोबत राहत असून त्यांचे पालन–पोषनाचा सर्व खर्च सामनेवाला यांस करावा लागत आहे.

११. अर्जदार हिने सामनेवाला याच्याकडून तिचे दरमहाचे उदरनिर्वाहासाठी रक्कम रुपये १५ हजार ची मागणी केली आहे. परंतु त्यांचे दरमहा खर्चाबाबतचे विवरण तिने अर्जात नमुद केलेले नाही. सबब अर्जदार हिचा दरमहा खर्च व सामनेवाला याचे दरमहाचे उत्पन्न तसेच सामनेवाला यास मुलांचा करावा लागणारा पालन–पोषनाचा खर्च याचा विचार करता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/– उदरनिर्वाहासाठी तसेच दरमहा रक्कम रुपये ५००/– न्यायालयीन खर्चासाठी अदा करण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. वरिल विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/– उदरनिर्वाहासाठी तसेच दरमहा रक्कम रुपये ५००/– न्यायालयीन खर्चासाठी अदा करावे.

३. प्रस्तुत अर्जाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

BHAGWAT MAMTARAM VALIBA

Digitally signed by BHAGWAT MAMTARAM VALIBA
Date: 2024.12.04 18:09:28 +0530

स्थळ : कराड ( एम.व्ही.भागवत )

दिनांक : ०४/१२/२०२४ ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड.